पिंपरी चिंचवड हानगरपालिका
पिंपरी १८, लेखा विभाग
क्र.लेखा/०६/कावि/२२९/२०२०
दिनांक :- १६/१२/२०२०

विषय:- सातवा वेतन आयोग फरकाच्या तरतूदीबाबत.

परिपत्रक,

मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.लेखा/०३/कावि/८५०/२०२० दि.११/१२/२०२० नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना सातवा वेतन आयोगाचे अनुषंगाने सुधारीत वेतनश्रेणी व भत्ते यांचे फरकाची रक्कम अदा करणेस मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने सर्व विभागांना या परिपत्रकाव्दारे कळविणेत येते की, सुधारीत वेतनश्रेणी व भत्ते यांचे फरकाच्या पहिल्या व दुस-या हप्त्याची रक्कम अदा करण्यासाठी सर्व विभागांकरीता लेखा विभागामध्ये सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकामध्ये "सातवा वेतन आयोग" या लेखाशिर्षावर एकत्रीत तरतूद केलेली आहे. तसेच सन २०२१-२२ चे मुळ अंदाजपत्रकामध्ये फरक रक्कम अदा करण्याकरीता एकत्रीत तरतूद करण्यात येणार आहे. सर्व विभागांनी सातव्या वेतन आयोगाच्या पहिल्या व दुस-या हप्त्याच्या फरकाची देयके लेखा विभागामधील "सातवा वेतन आयोग" या लेखाशिर्षावर क्रॉस बजेटव्दारे सदर तरतूदीमधुन खर्ची टाकणेत यावी. विभागांनी सन २०२०-२१ चे सुधारीत व सन २०२१-२०२२ चे अंदाजपत्रक सादर करताना त्यामध्ये फरकाची रक्कम समाविष्ट करू नये. सदर परिपत्रक आपले विभागातील संबंधीत कर्मचा-यांचे निदर्शनास आणुन द्यावे.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८

प्रति,

सर्व विभागप्रमुख,
पिं.चिं.म.न.पा. पिंपरी १८